18-19

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol (II)

12 January 2019 Special Issue – 68

# महिला सबलीकरणाच्या समस्या : आव्हाने आणि उपाय



**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce college,**
**Yeola, Dist. Nashik (M.s.) India**

**Executive Editor of This Issue**
**Prof. A.R. Bhosle**
**Assist. Prof. Head of Dept. Sociology**
**Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed**

**Dr. S.K. Galke**
**Assist. Prof. Dept. of Sociology**
**Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed**

SWATIDHAN PUBLICATION

Visit to - www.researchjourney.net

Scanned with OKEN Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय | January 2019 | UGC Approved No. 40705

# कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या स्त्रिंया आणि लिंगभाव विषमता

प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना :**

परिघाच्या बाहेर असलेल्या आणि आज परिघातून केंद्रस्थानी आणण्यास तयार असलेला समूह म्हणजे पारधी जमात. आजही या जमाती मध्ये पाहिजे ती प्रगती झालेली नाही आणि त्यातही पारधी जमातीच्या महिलांच्या बाबतीत अत्यंत वाईट परिस्थिती आहे. महिलांना शिक्षणापासून कोसो दूर ठेवण्यात आले तसेच महिलांचे अनेक प्रश्न आणि शोषण आजही कायम आहे तसेच आहेत. विषमता ही संकल्पना आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने वापरली जाते. सामाजिक विषमता ही सार्वत्रिक स्वरुपात आढळून येते. सामाजिक विषमता समजून घेतांना दारिद्र्य, सधनता, मागासलेपणा, वंचितता, संसाधनांचे वितरण ह्यासारख्या घटकांचा आधार घ्यावा लागतो. तसेच सामाजिक गट, विशिष्ट देश, समाज, स्तर ह्यांचाही विचार करावा लागतो.

भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात पारधी जमातीचे प्राबल्य संपूर्ण जिल्हयात आढळून येते. पारधी जमातीची सर्वाधिक संख्या उस्मानाबाद जिल्हयात आढळून येते. उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यात सर्वाधिक प्रमाणात आहेत. 60 पेक्षा जास्त वस्ती कळंब परिसरात असून ते स्वंतत्रपणे आपल्या वस्तीत राहत असतात. आजही या जमाती मध्ये स्त्रियांना स्वंतत्रपणे निर्णया घेण्याचा अथवा स्वाभिमानाने जगण्याचा अधिकारच मिळालेला नाही असेच दिसून येते. महाराष्ट्रामध्ये पारधी जमातीस अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या इ.स. 2002 च्या अनु. जमातींच्या यादीमध्ये ही जमात 38 व्या क्रमांकावर आहे. जिचे आडवीचिंचेर, फासं पारधी, फासे पारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, बहेल्लिया, चिता पारधी, शिकारी पारधी, टाकणकार आणि टाकिया असे उपगट समाविष्ट आहेत. स्वातंत्र्याच्या 70 वर्षानंतर आजही ही जमात विपन्नावस्थेत जीवन जगत आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, शिक्षणाचा अभाव, अठराविश्वे दारिद्रय जंगली आणि भटके जीवन यामुळे प्राण्यांपेक्षाही खालच्या पातळीचे जीवन जगणाऱ्या या जमातीमध्ये देखील लिंगभाव विषमता आढळून येते. बहुतांश जमातीमध्ये लिंगभाव विषमता आढळत नसली तरी पारधी जमातीमध्ये ती प्रकर्षाने जाणवते. या जमातीमधील स्त्रीया ह्या पुरुषांच्या तुलनेत अत्यंत हिनदीन अवस्थेत जीवन जगत असून त्यांची व्यथा ही पारधी पुरुषांपेक्षा वेगळी आणि कितीतरी मोठी आहे.

**संशोधनाची उद्दीष्टये :**

1. पारधी स्त्रियाची समाज व्यवस्थेतील जीवनशेली स्पष्ट करणे.
2. पारधी स्त्रियांवरील त्या जमातीतील सामाजिक निर्बंध स्पष्ट करणे.
3. पारधी जमातीतील त्या समाजात असलेली लिंगभाव विषमता स्पष्ट करणे.
4. पारधी स्त्रियांच्या सामाजिक समस्या बाबतीत समाजात जागृती निर्माण करणे.

**गृहीतके :**

1. पारधी स्त्रींचे शोषण पारंपारिक ते आधुनिक सामाजात देखील होतांना दिसून येते.
2. पारधी स्त्री हक्क आणि अधिकारांपासूनवंचित असतांना दिसून येत आहे.
3. पारधी जमातीमध्ये समाजव्यवस्थेत लिंगभाव विषमता असल्याचे दिसून येते.
4. पारधी स्त्रीची व्यथा पारधी समाजातील पुरुषांपेक्षा वेगळी आहे.

**संशोधन पध्दती :**

शोधनिबंध हा संशोधनाचा एक भाग असतो. ज्या प्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सुत्रण करतो आणि निष्कर्षाप्रत पोहचतो. त्याचप्रमाणे शोधनिबंधात देखील एखादी समस्या निश्चित करून त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते. त्याच प्रमाणे प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वृत्तपत्रांचा वापर करण्यात आला आहे. तसेच स्वतःला पारधी वस्तीवरील भेटी दिल्यानंतर आलेल्या अनुभवाला देखील अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

कळंब तालुक्यातील वाडी, वस्तीवर राहणात असलेल्या पारधी जमातीच्या अनेक कुटुंबाशी प्रत्यक्ष भेटी घेतल्यानंतर त्या कुटुंबातील महिला आणि त्यांच्या समस्या तसेच त्या महिलांना त्या जमातीमध्ये अथवा समाजामध्ये असलेले त्यांचे स्थान कसे आहे हे प्रत्यक्ष आलेल्या अनुभवातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**लिंगभाव विषमता :–**

लिंगभाव विषमता ही संपूर्ण भारतीय समाज असेल किंवा विश्वातील कोणत्याही देशात कुटुंबातील लहान मुलांपासूनच होत असतांना दिसून येते. भारतीय समाजात पुर्वीपासून लिंगाच्या आधारे भेद केला जातो. पुरुषांसाठी असलेले अनेक प्रकारचे अधिकार, हक्क, स्वातंत्र्य आणि संधी स्त्रियांना उपभोगता येत नाही.भारतीय संविधानाच्या भाग तीन मधील अनुच्छेद 14 ते 18 नुसार समानता प्रस्थापित करण्यासाठी तरतुदी केल्या असल्या तरी प्रत्यक्षात लिंगभाव



Scanned with OKEN Scanner

विषमता असल्याचे दिसून येते. हक्क, अधिकार, स्वातंत्र्य आणि संधी उपभोगण्यासंदर्भात स्त्री पुरुषांमध्ये लिंगाच्या आधारे केलाजाणारा भेदभाव म्हणजेच लिंगभाव विषमता होय.

भारतीय समाज व्यवस्थेत असेल किंवा इतर देशात सुध्दा स्त्रियांवर होणारा अन्याय, अत्याचार, शोषण हे सार्वत्रिक स्वरूपात दिसून येते. याला पारधी समाजातील स्त्रिया अपवाद राहू शकत नाहीत. या समाजातील निरक्षर स्त्रियांवर देखील कायमस्वरूपी पिढयानंपिढया दमन होत असलेले दिसून येते. मॅक्स वेबर यांच्यामते, विषमता ही सत्ता आणि अधिकार यांच्या विकेंद्रीकरणातुन निर्माण होते. सत्ता प्राप्त करण्याच्या क्षमतेमुळे भांडवल, भूमी, बौध्दीक क्षमता, भौतिक शक्ती व सामाजिक प्रतिष्ठा यासारख्या सामाजिक संसाधनांवर नियंत्रण मिळविले जाते. पारधी स्त्री अभावग्रस्त आणि समस्याग्रस्त जीवनामध्ये नवऱ्याची निष्ठेने सोबत करित असली तरी तिच्यावर लिंगाच्या आधारे अनेक निर्बंध लादले असल्याचे दिसून येते. म्हणून पारधी जमातीत लिंगभाव विषमता आहे असे म्हणता येते. पारधी जमातीत कोणत्याही कार्यक्रमातील महिलांचे स्थान असेल किंवा घरातील अन्य कार्यातील योगदान असेल तेव्हा प्रथम पुरूषांना मान–समान दिला जातो तर महिलांना आजही दुय्यमचं स्थान असलेले दिसून येते. कळंब तालुक्यातील पारधी महिलांचे प्रश्न, समस्या अनेक आहेत. कारण की आजही या महिलांना शिक्षण घेण्याची संधी त्या कुटुंबातून दिली जात नाही. तसेच समाज मनात ते विचार देखील दिसून येत नाही. समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्या समाजातील प्रमुख व्यक्ती देखील जास्त प्रयत्न करीत असलेले दिसून येत नाही.

**पारधी जमातीच्या स्त्रियाचा संघर्षाचा लढा :**

शासनाची शिकारीवरील बंदी आणि अनेक पशुपक्ष्यांना राखीव घोषित केल्यामुळे उदरनिर्वाहासाठी अनेक पारधी चोऱ्या करतात. चोरी वाटमारी करुन अथवा शिकारीवरुन थकुन आलेल्या नवऱ्याची व घरातील लहान मुलांच्या अन्नाची व्यवस्था स्त्रीलाच करावी लागते. त्यासाठी ती शेजारीन किंवा लेकराला सोबत घेऊन गावोगाव दारोदार भीक मागून शिळेपाके अन्न गोळा करते. तान्ह्या लेकराला दिवसभर छातीशी बांधुन त्याच्याही भुकेचा प्रश्न सोडविते. काही स्त्रिया चुंबकाच्या सहाय्याने रस्त्यांवरील लोखंड (भंगार) गोळा करतात. काही कचऱ्यातुन उपयोगाच्या वस्तू शोधून त्या आधारे कुटूंबाचा चरितार्थ चालवितात. संपूर्ण जमात दरिद्री असल्यामुळे ती आयुष्यभर नवऱ्याच्या जंगली जीवनासोबत भिंगरीसारखी फिरत असते.

दिसायला सुंदर असल्यास टवाळखोरांच्या वाकड्या नजरा तिच्यावर पडतात. भटकंती, कमी वयात विवाह आणि दरिद्र्यामुळे तिला शिक्षण घेता येत नाही.पतीला जास्त दिवसांचा कारावास झाल्यास अथवा तो बेपत्ता झाल्यास वडिल तिचा दुसरा विवाह करुन देतो. तिथेही तिला मुले होतात. त्यामुळे पतीची वासनापुर्ती करणे, अनेक मुलांना जन्म देणे, जुणे कपडे मागणे, भीक मागणे आणि शेवटी मरणे हेच तिचे जीवनचक्र झाले आहे. एकूणच तह हयात तिला संघर्ष करावा लागतो. नवऱ्याच्या गुन्ह्यासाठी अथवा गुन्हा नसतांना देखील पोलिसांचा अत्याचार सहन करावा लागतो.

**पारधी जमातीच्या स्त्रियावरील निर्बंध :**

पारधी समाजातील महिलांना आजही पर्णपणे स्वाभिमानाने जगता येत नाही. त्या समाजातील महिलांवर समाजातील अनेक निर्बंध लादलेले आहेत. पारधी स्त्रिया समाजात मुक्तपणे संचार करीत असतांना दिसून येत नाही.

पारधी जमातीत अनेक प्रथा, परंपरेला महत्व दिले जाते. तसेच त्यानुसारच समाजातील लोक या जमातीतील महिलांवर पारंपारिक नियमांचे पालन करण्यासाठी जाचक निर्बंध केले जाते. मासिक पाळीचा विटाळ आठ दिवस, मुलाचा जन्म विटाळ 3 महिने आणि मुलीचा जन्म विटाळ साडे 3 महिने पाळतात. जन्म विटाळातुन पवित्र होण्यासाठी स्त्रिला 3 दिवस गोमुत्राने हात व डोके धुवावे लागते. तिच्या हातच्या भाकरी गायीला खाऊ घालतात. तिसऱ्या दिवशी स्नान करुन देवीची पुजा करुन स्वयंपाक करुन पाच सुवासिनी जेवू घातल्यानंतर जन्मविटाळ फिटतो.

स्त्रीचे पाऊल वाकडे पडले, तिला किंवा तिच्या कपड्याला परपुरुषाचा कळत किंवा नकळत स्पर्श झाला तरी जात पंचायत स्त्रीलाच बहिष्कृत करते. एखाद्याकडून अनैतिक कृत्य घडले तर जात पंचायत कठोर दंड ठोठावते परंतू दंडाची रक्कम भरण्याची सोय नसल्यास आपली मुलगी, बायको किंवा दोघीही गहाण ठेवाव्या लागतात. त्यांचा गैरफायदा घेतला जातो. दंडाची रक्कम न आल्यास त्या तशाच बर्बाद होतात. म्हणजे पुरुषांचीही शिक्षा स्त्रियांनाच भोगावी लागते.

पतीसोबत पत्नीलाही जेलमध्ये कोंडले जाते. गरोदर असल्यास तेथेच अपत्याचा जन्म होतो. नवरा जेलमध्ये गेला की, जमानतीच्या पैशासाठी ती गहाण ठेवली जाते. तसेच मुलाबाळांच्या पालनपोषणाची जबाबदारी तिच्यावर येते. दसऱ्याला उत्साहात होणाऱ्या भवानी मातेच्या जत्रेमध्ये स्त्रीला अशुभ मानतात. जमातीत पितृसत्ताक कुटूंबपध्दती असून वडिलांच्या नावावरुन घराणे ओळखले जाते. लग्नानंतर मुलगी सासरी जाते. विधवेला आतेभावाशी लग्न करता येते. मावस किंवा मामेभावाशी लग्न करता येत नाही. पतीच्या मृत्युनंतर दिराशी लग्न करु शकते. भासऱ्याशी नाही. अशाप्रकारचे अनेक निर्बंध पारधी स्त्रीवर घालण्यात आले असून पुरुषाला मात्र सर्व प्रकारचे स्वातंत्र्य आहे.

**निष्कर्ष :**

पारधी समाजात आजही लिंगभाव विषमता असलेले दिसून येते. काळानुसार परिवर्तन होणे गरजेचे आहे. परंतु काही वस्तीवर भेटी दिल्यानंतर असे निदर्शनास आले की, स्त्रियांना कमी लेखले जाते. तसेच समाजात त्यांना मान–सन्मान मिळत नाही किंवा सन्मानास्पद वागणूक दिली जात नाही. पारधी जमातीमध्ये लिंगभाव विषमता आहे.



Scanned with OKEN Scanner

लिंगाच्या आधारेच स्त्रियांवर अनेक बंधने लादली आहेत. पुरुष ज्या हक्क, अधिकार, स्वातंत्र्य आणि संधींचा उपभोग घेतात त्यापासून स्त्रियांना वंचित ठेवले आहे. पारध्यांमध्ये जे वेगवेगळे धार्मिक विधी, संस्कार होतात, त्यामध्ये स्त्रियांना कोणतेच स्थान नाही. स्थळपुजा, जलपुजा, देवकार्य (जवाहरनो) आणि विवाहामध्ये तिला कोणतेच हक्क आणि अधिकार असल्याचे दिसत नाही. तिच्या जीवनाचे सर्व अधिकार पित्याला (पुरुषाला) आहेत. जो जास्त धाज देईल त्याच्याशी पिता तिचा विवाह करतो. धाज न दिल्यास मुलीला परत आणून दुसऱ्या मुलाशी तिचा विवाह करु शकतो. या जमातीमध्ये पत्नीला गहाण ठेवण्याचा अधिकार पतीला आहे. जात पंचायतीमध्ये बहुतांशपणे स्त्रीलाच निरपराधित्व सिध्द करावे लागते. या जमातीमध्ये पतीने पत्नीला मारहाण करण्यास एकप्रकारे मान्यताच दिली आहे. मासिक पाळीमध्ये स्त्रीला अपवित्र मानले जाते. मुलगा वडिलांच्या पाया पडतो आईच्या नाही. जन्मदात्या आईला गौण स्थान दिले जाते. तिच्या कपड्याला जरी पुरुषाचा स्पर्श झाला तरी तिलाच बहिष्कृत केले जाते.

अशाप्रकारे इतर अनुसूचित जमातींमध्ये लिंगभाव विषमता फारशी आढळत नसली तरी ती पारधी जमातीमध्ये प्रकर्षाने जाणवते. या विषमतेमुळे पारधी स्त्रीवर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होतात. हक्क, अधिकार आणि संधी नाकारल्या जातात. पारधी जमातीची एकुणच स्थिती वाईट असून त्यातही पारधी स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामते कोणत्याही समाजाची प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करावे लागते. पारधी स्त्रीवर लक्ष केंद्रित केल्यास त्यांच्या जीवन स्थितीमध्ये फारसा बदल झाला असल्याचे दिसून येत नाही. म्हणून पारधी समाजाच्या समस्या सोडवितांना पारधी स्त्रियांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करावे लागते. तेव्हाच पारधी जमात विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकेल.

संदर्भ :

1. कुमार एम. (2009). आदिवासी संस्कृति एवं राजनिति, विश्वभारती पब्लिकेंशन्स, नई दिल्ली.
2. राठोड गणपत(2015). घुमन्तु जनजातियों का सांस्कृतिक अध्ययन, पुजा पब्लिकेशन, कानपुर.
3. फुलवाडकर दिनानाथ, (2009). बोलियॉ एवं बोली कोश, समता प्रकाशन, कानपुर.
4. भारताचे संविधान,(2006). संचालक, मुद्रण व लेखनसामुग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारतसरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशीत केले.
5. चव्हाण रामनाथ, (1990). जाती आणि जमाती, मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे.
6. गारे गोविंद, (2012). महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
7. जाधव हुकुमचंद (2014). घुमंतू जातियों का लोकसाहित्य और भाषा का वैज्ञानिक अध्ययन, मित्तल एंड संस, दिल्ली.
8. भोसले नारायण, (2008), भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत–परंपरा आणि संघर्ष, द ताईची प्रकाशन, पुणे.

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 39. | जागतिकिकरण आणि महिलांचे सबलीकरण | प्रा. विरभद्रेश्वर सामलिंग स्वामी | 106 |
| 40. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा.डॉ. अन्सारी एस. जी. | 109 |
| 41. | नारीवादी अध्ययन तथा लेखन की आवश्यकता | डॉ.व्यास सी.पी. | 111 |
| 42. | कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या स्त्रिया आणि लिंगभाव विषमता | प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड | 113 |
| 43. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे, | 116 |
| 44. | मराठी स्त्रीवादी साहित्य, समाज आणि स्त्रिया | प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे | 119 |
| 45. | महिलांमधील रोजगार योजने संदर्भातील जागरूकता आणि लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | डॉ. अनिता जिवतोडे (टेकाडे) | 121 |
| 46. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | श्री. बापू तुकाराम बाराते | 124 |
| 47. | साहित्य समाज आणि स्त्रिया | डॉ. जनार्दन काटकर | 126 |
| 48. | कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि स्त्रियांपुढील आव्हान | डॉ. रेखा एम. शेरकर | 129 |
| 49. | परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न | प्रा.डॉ.संतोष देशमुख | 132 |
| 50. | भारतीय समाज व्यवस्थेला लागलेली किडः हुंडा प्रथा | प्रा.बोराडे तानाजी रामभाऊ | 134 |
| | कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने –एक समजाशास्त्रीय अभ्यास | डॉ. गायके एस.के., कांबळे एम.एस. | 136 |
| 51. | कौटुंबीक हिंसाचार व स्त्रिया | कांबळे दलित सुभाषराव | 140 |
| 52. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि आव्हाणे | डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे | 142 |
| 53. | मध्यम वर्गीय स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा. कोल्हे टी. टी. | 143 |
| 54. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा.डॉ. विजय दि. पोकळे | 146 |
| 55. | महिला चळवळ आणि स्त्रिया | डॉ. यादव घोडके | 149 |
| 56. | मैत्रेयी पुष्पा के साहित्य में स्त्री और समाज | प्रा.श्रीमती पोटकुले हिरा | 151 |
| 57. | भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रिया आणि हुंडा प्रथा | भिमराव मोटे | 153 |
| 58. | भारतीय महिलांसमोरील समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. परळकर शशिकांत दत्तोपंत | 154 |
| 59. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.डॉ. आचार्य आर. डी. | 156 |
| 60. | महिला चळवळ आणि समाजसुधारकांचे योगदान | प्रा.डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव | 158 |
| 61. | स्त्रीवादी अभ्यास, विकास आणि स्त्रीया | प्रा. गोदादरी व्ही. बन | 161 |
| 62. | भारतीय स्त्रि.विषयक कायद्याची वास्तविकता.विश्लेषत्मक अध्ययन | प्रा.सिताराम कचरु मोगल | 164 |
| 63. | वैश्विक लैंगिक अंतराल में भारत की स्थिति का अध्ययन | प्रा. छाया एस. तोटवाड, प्रा. डॉ. सुर्यकांत टि. पवार | 167 |
| 64. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.सोनटक्के रमेश शंकरराव | 169 |
| 65. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा. सुलभा बब्रुवान सोळंके | 172 |
| 66. | स्त्री विरोधी हिंसा- कारणे व उपाय | प्रा.डॉ.बी.एन.कावळे | 174 |
| 67. | लिंगभाव असमानता आणि बांधकाम क्षेत्रातील स्त्रियांच्या समस्या | प्रा. भोसले एस. | 176 |

| | | | |
|---|---|---|---|
| 39. | जागतिकिकरण आणि महिलांचे सबलीकरण | प्रा. विरभद्रेश्वर सामलिंग स्वामी | 106 |
| 40. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा.डॉ. अन्सारी एस. जी. | 109 |
| 41. | नारीवादी अध्ययन तथा लेखन की आवश्यकता | डॉ.व्यास सी.पी. | 111 |
| 42. | कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या स्त्रिया आणि लिंगभाव विषमता | प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड | 113 |
| 43. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे, | 116 |
| 44. | मराठी स्त्रीवादी साहित्य, समाज आणि स्त्रिया | प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे | 119 |
| 45. | महिलांमधील रोजगार योजने संदर्भातील जागरूकता आणि लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | डॉ. अनिता जिवतोडे (टेकाडे) | 121 |
| 46. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | श्री. बापू तुकाराम बाराते | 124 |
| 47. | साहित्य समाज आणि स्त्रिया | डॉ. जनार्दन काटकर | 126 |
| 48. | कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि स्त्रियांपुढील आव्हान | डॉ. रेखा एम. शेरकर | 129 |
| 49. | परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न | प्रा.डॉ.संतोष देशमुख | 132 |
| 50. | भारतीय समाज व्यवस्थेला लागलेली किडः हुंडा प्रथा | प्रा.बोराडे तानाजी रामभाऊ | 134 |
| | कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने –एक समजाशास्त्रीय अभ्यास | डॉ. गायके एस.के., कांबळे एम.एस. | 136 |
| 51. | कौटुंबीक हिंसाचार व स्त्रिया | कांबळे दलित सुभाषराव | 140 |
| 52. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि आव्हाणे | डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे | 142 |
| 53. | मध्यम वर्गीय स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा. कोल्हे टी. टी. | 143 |
| 54. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा.डॉ. विजय दि. पोकळे | 146 |
| 55. | महिला चळवळ आणि स्त्रिया | डॉ. यादव घोडके | 149 |
| 56. | मैत्रेयी पुष्पा के साहित्य में स्त्री और समाज | प्रा.श्रीमती पोटकुले हिरा | 151 |
| 57. | भारतीय समाजव्यवरथेत स्त्रिया आणि हुंडा प्रथा | भिमराव मोटे | 153 |
| 58. | भारतीय महिलांसमोरील समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. परळकर शशिकांत दत्तोपंत | 154 |
| 59. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.डॉ. आचार्य आर. डी. | 156 |
| 60. | महिला चळवळ आणि समाजसुधारकांचे योगदान | प्रा.डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव | 158 |
| 61. | स्त्रीवादी अभ्यास, विकास आणि स्त्रीया | प्रा. गोदावरी व्ही. बन | 161 |
| 62. | भारतीय स्त्रि.विषयक कायद्याची वास्तविकता.विश्लेषत्मक अध्ययन | प्रा.सिताराम कचरु मोगल | 164 |
| 63. | वैश्विक लैंगिक अंतराल में भारत की स्थिति का अध्ययन | प्रा. छाया एस. तोटवाड, | 167 |
| | | प्रा. डॉ. सुर्यकांत टि. पवार | |
| 64. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.सोनटक्के रमेश शंकरराव | 169 |
| 65. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा. सुलभा बब्रुवान सोळंके | 172 |
| 66. | स्त्री विरोधी हिंसा- कारणे व उपाय | प्रा.डॉ.बी.एन.कावळे | 174 |
| 67. | लिंगभाव असमानता आणि बांधकाम क्षेत्रातील स्त्रियांच्या समस्या | प्रा. भोसले एस. | 176 |




Scanned with OKEN Scanner